# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

केंद्र क्र. १, १३ वा मजला, जागतिक व्यापार केंद्र,
कफ परेड, कुलाबा, मुंबई-४०० ००५
**दूरध्वनी: ०२२-२२१६ ३९६४/६५/६९ फॅक्स: ०२२-२२१६ ३९७६**
ई-मेल: **mercindia@mercindia.org.in** वेब-साईट www.mercindia.org.in


प्रकरण क्र. २०११/६५ दिनांक १५ जून, २०११

**विद्युत अधिनियम, २००३ (विअ, २००३) च्या कलम (१५) च्या उप-कलम (५)च्या खंड (ए) खाली नोटीस**

१ मुंबई उपनगर जिल्ह्यात (भांडूप व मुलुंड वगळून) समाविष्ट असलेल्या क्षेत्रासाठी आणि मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या क्षेत्राकरिता, मे. रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड (आरइन्फ्रा) ने वितरण परवाना मंजूर करण्यासाठी अर्ज केला आहे. महाराष्ट्र शासनाने त्यांच्या १० जानेवारी, १९९० च्या अधिसूचनेद्वारे चेने आणि वर्सोवा महसुली गावात समाविष्ट असलेले क्षेत्र मिरा-भाईंदर नगरपालिका परिषदेचा भाग असल्याचे अधिसूचित केले होते. त्यानंतर, मिरा-भाईंदर नगरपालिका परिषद ही मिरा-भाईंदर महानगरपालिका या नावाने महानगरपालिका झाल्याचे अधिसूचित करण्यात आले. ही दोन गावे आर-इन्फ्रा च्या प्रचलित परवाना क्षेत्राला सलग लागून आहेत.

२. विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १५ च्या उप-कलम २ नुसार आर-इन्फ्राने, त्यांच्या अर्जाची नोटीस 'टाईम्स ऑफ इंडिया', 'हिन्दुस्थान टाईम्स', 'लोकसत्ता' आणि 'सामना' या वर्तमानपत्रांच्या दि. १० मे, २०११ रोजीच्या आवृत्त्यांमध्ये मध्ये प्रसिध्द केली.

३. आर-इन्फ्राच्या सीमा स्थूलमानाने पुढीलप्रमाणे आहेत :- मुंबई उपनगर जिल्ह्याच्या पश्चिम उपनगर क्षेत्रातील बांद्रा ते दहिसर हा भाग, मुंबई उपनगर जिल्ह्यातील पूर्व उपनगर क्षेत्रातील चुनाभट्टी ते विक्रोळी आणि मानखुर्द हा भाग. या प्रस्तावित क्षेत्रामध्ये चेने व वर्सोवासह मिरा-भाईंदर महानगरपालिकेच्या संपूर्ण क्षेत्राचा देखील समावेश आहे. परवान्याच्या प्रस्तावित क्षेत्राची तपशीलवार माहिती हवी असणा-या इच्छुक व्यक्तींनी आर-इन्फ्राने परवान्याच्या मंजुरीसाठी सादर केलेला अर्ज कृपया पाहावा. सदर अर्ज आयोगाच्या www.mercindia.org.in या संकेत-स्थळावर उतरवून घेण्याच्या स्वरुपात उपलब्ध आहे.

४. आर-इन्फ्राचे नोंदणीकृत कार्यालय एच-ब्लॉक, पहिला मजला, धिरुभाई अंबानी नॉलेज सिटी, नवी मुंबई – ४०० ०७० येथे आहे.

५. रिलायन्स इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेडने आयोगाला सादर केलेल्या अर्जाची प्रत त्यासोबतच्या जोडपत्रांसह आयोगाच्या www.mercindia.org.in या संकेत-स्थळावर किंवा कोणत्याही व्यक्तिला महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (कामकाज प्रचालन) विनियम, २००४ मध्ये विहित करण्यात आलेल्या कार्यपध्दतीचे पालन करुन आयोगाच्या कार्यालयात पाहता येईल.

६. वर्तमानपत्रांत प्रसिध्द करण्यात आलेल्या वरील अर्जाच्या नोटीशीच्या संदर्भात, जनतेकडून सूचना आणि हरकती प्राप्त झाल्या आहेत. उपलब्ध असलेल्या माहितीचा विचार केल्यानंतर, आयोगाचे

सकृत्दर्शनी समाधान झाले आहे की, अर्जदार प्रस्तावित क्षेत्रामध्ये विजेचा पुरवठा करण्याकरिता वितरण परवाना मंजूर करण्यासाठी अर्हताप्राप्त आहे. आयोग, विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १४ नुसार अर्जदारास वितरण परवानाधारक म्हणून परवाना देण्याचे प्रस्तावित करीत आहे.

७. आर-इन्फ्राला वितरण परवाना आयोगाने मंजूर करण्यासंदर्भात **सूचना किंवा हरकती**, असल्यास, त्या मागविण्यासाठी विद्युत अधिनयम, २००३ च्या कलम (१५) च्या उप-कलम (५) च्या खंड (ए) नुसार, याद्वारे नोटीस देण्यात येत आहे. या **सूचना किंवा हरकती** वरील पत्त्यावर आयोगाकडे **बुधवार, दि. ६ जुलै, २०११** रोजी किंवा त्यापूर्वी खाली सही करणाऱ्यास प्राप्त होतील अशा बेताने पाठवाव्यात. या तारखेनंतर प्राप्त होणाऱ्या सूचना किंवा हरकती विचारात घेतल्या जाणार नाहीत.

८. इच्छुक व्यक्तींनी त्यांच्या **सूचना किंवा हरकती**, असल्यास, इंग्रजी किंवा मराठी भाषेत, ६ प्रतींमध्ये, त्याचे पूर्ण नाव, पोस्टाचा पत्ता आणि ई-मेल आयडी, असल्यास, त्यासह पाठवाव्यात. तसेच **सूचना किंवा हरकती** कोणत्याही संस्थेच्या किंवा ग्राहकांच्या वर्गवारीच्या वतीने दाखल करण्यात येत असल्यास तसे त्यात नमूद करावे. तसेच सूचना किंवा हरकती पाठविणाऱ्या व्यक्तिला त्याचे म्हणणे आयोगासमोर व्यक्तिशः मांडावयाचे असल्यास तसे देखील त्यात नमूद करण्यात यावे, म्हणजे अशा व्यक्तीला आयोगातर्फे **शनिवार, ९ जुलै, २०११ रोजी सकाळी १०.०० वाजता, रंगशारदा नाट्य मंदिर, बांद्रा रेक्लमेशन, बांद्रा (पश्चिम), मुंबई - ४०० ०५०**, येथे होणाऱ्या जाहीर सुनावणीच्या वेळी त्याचे म्हणणे मांडण्याची संधी देण्यात येईल. यासाठी कोणतीही वेगळी सूचना देण्यात येणार नाही.

ठिकाण : मुंबई (के.एन.खवारे)

दिनांक : १५ जून, २०११ सचिव, मविनिआ